# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष ३ ले. अंक २ ला. नवी मुंबई दिनांक १ ते ३१ऑगष्ट २०१३ पाने ८ किंमत २० रूपये



## माहिती अधिकार वापरा, पोलीस स्टेशनची कामगिरी तपासा

## गुंड आणि मवाल्यांना पोलीस लावताहेत मसका !
## सामान्य माणसांच्या उरावर मात्र कायद्याचा धसका !








# नागरिकांचे अधिकार व पोलीस स्टेशन

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक **नागरिक अधिकार**

**सुभाष बसवेकर**
● संपादक ●
**गणेश काजळे-पाटील**
●कार्यकारी संपादक●


संपादक मंडळ /प्रतिनिधी

किरण मांजरेकर (मुंबई)
रजनीकांत शिंदे (मुंबई)
प्रमोद लक्ष्मण कदम(मुंबई)
देविदास चौथमल (औरंगाबाद)
भगवान वाहूळे (पूणे)
राजेश ठाकूर (नागपूर)
राजेश बने (रायगड)
प्रीतम यादव (सातारा)
डॉ.नृसिंह भस्मे (कोल्हापूर)
अजित कोठारी (जालना)
मोतीराम काळे (नांदेड)
स.अहमद स.अली अन्सारी(परभणी)


अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : **नागरिक अधिकार**
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com

: web site :
rtimahasangh.weebly.com



संपादकीय...........



# गुंड आणि मवाल्यांना पोलीस लावताहेत मसका ! सामान्य माणसांच्या उरावर मात्र कायद्याचा धसका !

सदरक्षणाय आणि खल निग्रहणाय हे पोलीसांचे ब्रीद आहे.सज्जनांना सरंक्षण आणि दुर्जनांना शिक्षा देण्याचा आदर्श सांगणारया पोलीस स्टेशनमध्ये आज सज्जनांची पाऊल ठेवायची हिम्मत होत नाही.कारण सज्जन आपल्यावर झालेल्या अन्यायाची फिर्याद देण्यासाठी साहेबांना भेटण्यासाठी केबीन बाहेर ताटकळत उभा असतो.त्याच वेळी अन्याय करणारे गुंड / मवाली / दोन नंबरचे धंदेवाले / हप्ते देणारे लोक साहेबांच्या केबीन मध्ये गुलगप्पा छेडीत असतात.त्यांच्याकडून पाकीटे पोहचतात.त्यांना चहापाणी व खातीरदारी करण्यात पोलीसांचा वेळ संपतो.फिर्याद देण्यासाठी आलेल्या गरीब नागरिकांना मात्र साहेब बिझी आहेत,नंतर या असे सांगून पिटाळून लावले जाते.गरीब व सज्जन माणूस पोलीस स्टेशनमध्ये गेला आहे.त्यांची आस्थेवाईक चौकशी करून गुंडांच्या मुसक्या आवळल्या असा एकही चमत्कार कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये होताना दिसत नाही.उलट गरीब माणसांच्या उरावर कायद्याचा धसका दाखवायचा आणि त्यालाअसा पिळून काढायचा की त्याने पुन्हा आयुष्यात पोलीस स्टेशन नाव नको घ्यायला,अशी कार्यपद्धती विकसीत झालेली आहे.

समजा तुमच्याकडे चोरी झाली,लूट झाली, वाहन चोरीला गेले तर तुम्ही जेव्हा फिर्याद द्यायला जाता तेव्हा,तुमच्या वस्तू जर तुम्हाला सांभाळता येत नसतील तर झक मारता काय ? असे सुनावले जाते.मी पाहिलेली एक सत्य घटना आहे.एक गरीब महिलेचे मुल हरवले म्हणून ती पोलीसात तक्रार द्यायला गेली तेव्हा सांभाळता येत नसेल तर पैदाच कशाला केले ? अशी भाषा पोलीसांनी वापरलेली मी ऐकली आहे.खरे तर अशा वेळी त्या हतबल महिलेला दिलासा देणे हे पोलीसांचे कर्तव्य होते.परंतु पोलीसांना संवेदनाच राहिल्या नाहीत.पोलीस स्टेशन हे जगातले सर्वाधिक असंवेदनशील ठिकाण झाले आहे.सिव्हील सोसायटीमधील पोलीसांची भूमिका महत्त्वाची असते हे आम्ही नाकारलेले नाही.पोलीसांच्या केवळ आस्तित्वानेही असामाजिक तत्वांना धाक बसतो.हे ही मान्य आहे.परंतु जनसामान्यांशी पोलीसांची नाळ तूटलेली आहे.समान्य माणसाला पोलीसांबद्दल विस्वास व भरोसा राहिलेला नाही.हे म्हणणे खाटे वाटत असेल तर गृहखात्याने खुला सर्व्हे करावा.सामान्य माणसांवर खरोखर अन्याय झाला असला तरी त्याचे नशीब चांगले असेल तरच साधा एफ आर आय फाटतो तपास होणे व न्याय मिळणे हे तर कोसो दूर राहते.

पोलीस आणि जनता यांच्यात हे अंतर पडले आहे.त्यामागे भ्रष्ट अर्थकारण व हस्तक्षेपी राजकारण तसेच कर्त्यव्यनिष्ठा विसलेले अधिकारी असे अनेक पैलू आहेत.पोलीसांबद्दलचा समाजाचा भरोसा जर वितळत चालला तर याचे समाजावर गंभीर परिणाम होत जातील.हे थांबविण्यासाठी जागरूक नागरिक गटांचा दबाव,पोलीस यंत्रणा ही गृहखात्यांकडून काढून ती स्थानिक ग्रामसभा व नगरसभा यांच्या अधिपत्याखाली आणावी लागेल.पोलीसामध्ये व्यापक पोलीस रिफॉर्म आणावा लागेल.तरच पोलीसावरील जनतेचा उडालेला भरोसा पुन्हा येइल.उद्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी हे आपणास करावेच लागेल.




# नागरिकांचे अधिकार व पोलीस स्टेशन



पोलीस स्टेशनला जायचा प्रसंग म्हटलं की सामान्य माणसांच्या पोटात भितीचा गोळा उभा राहतो.परंतु खरे तर असे घाबरण्याचे काही कारण नाही.कायदा जितका सामान्य नागरिकांना लागू असतो तसाच तो पोलीस यंत्रणेलाही लागू असतो.पोलीसांना हुकूमशाही पद्धतीने वागता येत नाही.पोलीसांनाही कायद्याने ठरवून दिलेल्या कक्षेतच वागावे लागते

•नागरिकांना आपली तक्रार कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये नोंदविता येईल.• गुन्हा कोणत्याही हद्दीत घडला असला तरी तक्रारदारास त्या हद्दीतील पोलीस स्टेशनला जा असे सांगता येणार नाही.• दखल पात्र गुन्हाची तक्रार नोंदविल्यानतर प्रथम खबरी अहवालाची एक प्रत तक्रारदारास विनाशूल्क देण्यात येते.•अदखलपात्र (एन.सी.) नोंदविली असल्यास पोलीस स्टेशनला तपासाचे अधिकार नसतात.अदखलपात्र तक्रारीचा तपास करण्याचे आदेश संबंधीत क्षेत्रातील न्यायाधिश पोलीस स्टेशनला देवू शकतात.तक्रारदारांनी न्यायाधिशाकडे विनंती अर्ज दाखल करावा.असा आदेश आल्यानंतर पोलीस तपास करून अहवाल न्यायालयात सादर करतील.• रेल्वे गाडीत अपराध घडल्यास लोहमार्ग पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करावा.लाब पल्ल्याच्या गाडीत गार्ड कडेही लेखी तक्रार करता येते. लोहमार्ग पोलीस स्टेशन जवळ नसल्यास जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंद करता येते.• कुठल्याही अपघात किंवा घातपात प्रसंगी आणिबाणीच्या प्रकरणी जेव्हा पोलीसांची मदत आवश्यक असते अशावेळी पोलीस नियंत्रण कक्षाशी १०० नंबरवरून संपर्क साधावा.पोलीस नियंत्रण कक्षातून संबंधीत पोलीस स्टेशनला संदेश जाईल व पोलीसांचे फिरते बीनतारी गस्त पथक आपल्या मदतीला शक्य तितक्या तातडीने पोहचू शकेल.•कायदा पोलीसांना काही निश्चित परिस्थितीमध्ये लोकांना अटक करणे व आवश्यक होत असल्यखस बळाचा वापर करण्याचे अधिकार देतो. •अभ्यासातून हे निष्पन्न झाले आहे की अनेक वेळा छोट्या गुन्हयांच्या आरोपाखाली जास्त लोकांना अटक होते. कायद्याचे अज्ञान व अपूरे ज्ञान असल्यामुळे असे विचाराधिन कैदी कारागृहात जास्त काळ राहतींत.कावरण ते जामीन देण्यास व आवश्यक कायदेशीर प्रक्रीया पूर्ण करण्यास कमी पडतात. अटक व स्थानबध्दतेमुळे व्यक्तीच्या प्रतिष्ठेला धक्का पोहचतो. दुदैर्वाने अनावश्यक अटक झालेल्या व्यक्तीला भरपाई देण्याची कोणतीही तरतूद आपलया न्यायप्रक्रियेत नाही.( संदर्भ : कलम ४६ सी.आर.पी.सी. २) भारतीय विधी आयोग नोव्हेंबर २०००)• मानव आधिकार कार्यकर्त्यांनी हे पोलीसांच्या लक्षात आणून द्यावे तसेच पोलीसांनीही हे पक्के लक्षात ठेवावे की अटक प्रक्रियेमध्ये विधी संमत प्रक्रिया वगळता अटक होवू घातलेल्या व्यक्तीला त्याच्या जन्मसिद्ध मानवीय अधिकार व स्वतंत्रेच्या अधिकारापासून वंचित ठेवता येणार नाही. (संदर्भ भारतीय संविधान अनुच्छेद -२१) • अटक करण्यापूर्वी अटक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची त्याच्या नाव असलेल्या पट्टयाने व छातीवर लावलेल्या नाव व पदाच्या बिल्ल्याद्वारे झाली पाहिजे. आपणास कोणता अधिकारी अटक करीत आहे हे अटक होत असलेल्या व्यक्तीस कळाले पाहिजे. (संदर्भ : डी.के. बसू वि.पं. बंगाल राज्य ए.आय.आर.एस.सी. ६०) • अटक होत असलेल्या व्यक्तीला अटकेसंबंधीची कारणे सुस्पष्टपणे सांगून अटक करणे ही पोलीसांची जबाबदारी आहे.अटक होणाऱ्या व्यक्तीला अटकेचे कारण न सांगणे हा पोलीसांचा बेजबाबदारपणा ठरतो. (भारतयीय संविधान अनुच्छेद -२२)• अटक केलेल्या व्यक्तीच्या कोणत्याही जवळच्या नातेवाईकांस किंवा मित्रास त्याच्या अटकेसंबंधी व त्यास स्थानबद्ध केलेल्या ठिकाणासंबंधी सुचित वेले पाहिजे. व्यक्तीच्या अटकेसंबंधी कोणत्या व्यक्तीस केव्हा व कोणत्या माध्यमातून सुचीत करण्यात आले याची नोंद पोलीस स्टेशनमधील पोलीस डायरी मध्ये करणे ही पोलीसांची जबाबदारी आहे. (संदर्भ ) सी.आर.पी.सी.कलम ५० अ (३) • अटक केलेल्या व्यक्तीला अटक करतेवळे अटक होणाऱ्या व्यक्तीच्या अंगावर शरिरीक इजा किंवा जखमा तर नाहीत ना याची पोलीसांनी खातरजमा करणे आवश्यक आहे.अशी इजा किंवा जखमा असतील तर त्याची नोंद प्रथम खबरी रिपोर्ट मध्ये होणे आवश्यक आहे.तसेच अटक झालेल्या व्यक्तीचे शक्य तितक्या लवकर वैद्यकीय परिक्षण केले जाणे आवश्यक आहे.• अपवादात्क परिस्थिती सोडून कोणत्याही महिलेला सुर्यास्तापासून ते सुर्योदयापर्यंत च्या काळात म्हणजे रात्रीच्या वेळी अटक करू नये.तसेच दिवसा अटक करते वेळी महिला पोलीस उपस्थित असणे आवश्यक आहे (संदर्भ : सी.आर.पी.सी कलम ४६) • संशयीत महिलेला पोलीस स्टेशनमध्ये वेगळया व कच्च्या कैदते ठेवावे. (संदर्भ न्यायालयाचा न्यायनिर्णय महाराष्ट्र शासन विरूद्ध शिला बारसे ) • महिला व मुलींच्या तक्रारीची ताबडतोब दखल घेवून चौकशी

# नागरिकांचे अधिकार व पोलीस स्टेशन

व तपास करून आरोपीस अटक करण्यात येईल.सदर तक्रारीमध्ये व्यवस्थीत पुरावे गोळा करून तपासात काहीही विसंगती न ठेवता ताबडतोब अभियोग न्यायालयात दाखल करण्यात येईल.बलात्कार व छेडखानी या सारख्या गुन्हयामध्ये महिला पिडीतांशी सहानुभूतीपूर्वक व्यवहार करावा तसेच त्यांच्या गुप्ततेची योग्य ती खबरदारी घ्यावी.● विवाहित महिलांच्या संशयीत मृत्यू प्रकरणी सहाय्यक पोलीस आयुक्त / उपविभागीय पोलीस अधिकारी भेट देवून मृत्यूंची कारणमिमांसा करतील.● कोणत्याही बालकांचे किंवा मुलांना अटक करते वेळी मारहाण करू नये. अज्ञान व्यक्तींना अटक करतेवळी समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींचे सहकार्य घ्यावे.● अटक झालेल्या व्यक्तीच्या मानवी प्रतिष्ठेचे रक्षण करणे ही पोलीसांची जबाबदारी आहे.अटक व्यक्तींचे प्रदर्शन किंवा कवायत काढणे यामुळे प्रतिष्ठेचे हनन होते.● व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा सन्मान करून त्याची / तिची झडती घ्यायला हवी.झडती घेतेवळी अनावश्यक बळजबरी करू नये. ● महिला व्यक्तीची झडती महिला पोलीसांच्याकडूनच झाली पाहिजे. (संदर्भ : सी.आर.पी.सी ५१ (२))● फौजदारी प्रक्रीया संहिता मध्ये जमीनपात्र गुन्हे व अजामीनपात्र गुन्हे असे वर्गीकरण केले आहे.जामीनयोग्य गुन्हयामध्ये आरोपात अटक झालेल्या व्यक्तीला जमीन घेण्याच्या कायदेशीर प्रक्रियेची माहिती देणे ही पोलीसांची जबाबदारी आहे.● जामीनपात्र गुन्हयात जामीन देणे तपासी अंमलदारावर बंधनकारक आहे.● अजामीनपात्र गुन्हयामध्ये वकील व योग्य जामीनदारामार्फत अटक झालेला व्यक्ती जामीनाचा प्रबंध करू शकेल. त्या बाबतच निर्णय दंडाधिकारी / न्यायाधिश घेतात. ● अटक झालेल्या व्यक्तीला पोलीस कोठडीत तिच्या / त्याच्या वकीलाला पूरेशा काळासाठी भेटण्याची व कायदेशीर मार्गदर्शन घेण्याची परवानगी असते.● अटक व स्थान बद्ध करून ठेवलेल्या व्यक्तीची माहिती व स्थानबद्धतेचे ठिकाण याची माहिती पोलीस नियंत्रण कक्ष आणि जिल्हा व राज्य मुख्यालय येथे देणे ही संबधीत पोलीस स्टेशनची जबाबदारी आहे.● अटक झालेल्या व्यक्तीला २४ तासाच्या आत न्यायालयसमोर उभे करून अटकेची मुदत वाढवून घेणे ही पोलीसांची जबाबदारी आहे.न्यायाधीश व दंडाधिकारी यांच्या समोर उभे करून त्यांचा ओदश घेतल्याशिवाय आरोपीना २४ तासापेक्षा अधिक काळ डांबून ठेवणे म्हणजे अटक व्यक्तीच्या अधिकार व स्वातंत्र्याचे गंभीर हनन करणे होय. अशा व्यक्तीच्या नातेवाईकांनी तात्काळ अशा परिस्थितीची माहिती पोलीसांच्या वरीष्ठांना व संबधीत क्षेत्रातील न्यायायलाला कळवावी.● अटक आरोपीना हातकडी घालण्याअगोदर गुन्हयाचे स्वरूप गुन्हेगार आरोपीची वागणूक व पूर्व इतिहास, पलायन करण्याची शक्यता आदि कारणे लेखी स्वरूपात नोंदविली पाहिजेत.त्याशिवाय आरोपीना हातकडी किंवा बेडी घालता येणार नाही.याशिवाय न्यायाधिशांच्या परवानगीनंतरच हातकडी व बेडी यांचा आरोपीवर वापर करता येईल ● एखादया तक्रारीनंतर विचारपूस करण्याकरीता बोलाविण्यात येणाऱ्या व्यक्तीला लेखी आदेश पाठविणे ही पोलीसांची जबाबदारी आहे. (सी.आर.पी.सी.कलम १६०(१))● कोणत्याही व्यक्तीला विचारपूस व तपास कामासाठी खूप वेळ पर्यंत पोलीस स्टेशनमध्ये ताटकाळत ठेवू नये यामुळे सदर व्यक्तीच्या मानवी अधिकाराचा संकोच होतो. हा रुंकोच अनैतिक बंदीवास ठरू शकतो.● अटक असलेल्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारची क्रूर यातना दिली जावू नये. किंवा अमानवीय किंवा अपमानजनक व्यवहार केला जावू नये.● अटकेतील कोणत्याही व्यक्तीस अपराध कबूल करणेस, बळजबरीने व मारहान करून स्वत:ला गुन्हात गुंतविण्यायोग्य जबाब देण्यास भाग पाडू नये किंवा इतर व्यक्ती विरोधात बळजबरीने साक्ष देण्यास भाग पाडू नये.● सात वर्षेपेक्षा लहान मुलाना अटक करता येत नाही.अटक केलेल्या मुलांचा कोणताही खूलासा मिडीयाला देता येणार नाही.● एखादया प्रकरणात लहान मूल जरी समान अपराधात सहभागी असले तरी त्यास प्रोढआरोपीबरोबर आरोपपत्र दाखल करता येत नाही. (बाल न्यायालय अधिनियम१९८६ कलम १८ ) ● कोणत्याही अपघात स्थळी किंवा गुन्हयाच्या ठिकाणी अटक, झडती, जप्ती इंत्यादीचा पंचनामा हा घटनास्थळी तयार करून त्यावर झडती व जप्तीच्या वेळी निरिक्षणासाठी हजर असलेल्या किमान दोन पंचाच्या सह्या घेणे आवश्यक आहे.● पंचनामा सामान्यत: दिवसा केला पाहिजे.परंतु तशी परिस्थिती नसेल तर रात्रीही केला जाईल.● पंचनाम्याची एक प्रत संबंधीत इसमाने नाही मागीतली तरी ती देणे ही पोलीसाची जबाबदारी आहे.● झडती घेताना पोलीस अधिकारी यांनी त्यांचे नाव व हुददा असलेली नामपट्टीका गणवेशावर लावणे आवश्यक आहे. (संदर्भ नागरिकांची सनद गृहमंत्रालय महाराष्ट्र शासन)● सामान्य नागरिकांना व मानव अधिकारन कार्यकर्त्यांना पोलीसांच्या शांतता समिती ,मोहल्ला समिती, महिला सुरक्षा समिती आदीमध्ये सहभागी होऊन पोलीस प्रशासन अधिकाधिक लोकाभिमूख करण्यासाढी प्रयत्न करता येईल.

खाली पडण्यात अपयश नाही तर पडून राहण्यात अपयश आहे.

# माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी आपल्या परिसरातील पोलीस स्टेशनमध्ये कायदा योग्य राबविला जातो की नाही याची तपासणी करण्यासाठी नमूना अर्ज

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी.

सहाय्यक पोलीस सुपरिंटेंडस्/ पोलीस उपायुक्त कार्यालय

तालुका -------------- जिल्हा ------------------

१) अर्जदाराचे पूर्ण नाव :-----------------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : -------------------------------------------------------------------

३) माहितीचा विषय ----------------------------------------या पोलीस स्टेशनमधून खालील माहिती मिळणे बाबत.

४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (पुढीलप्रमाणे)

१) या पोलीस स्टेशनच्या हद्दीत सन २०१२ ते २०१३ च्या आज अखेर तारखेपर्यंत काळात चैन स्नॅचिंग (सोन्याची साखळी खेचून पळविणे ) च्या किती घटना घडल्या ?फसवणूक करून सोन्याचे दागीने पळवण्याच्याअशा प्रत्येक गुन्हयातील प्रत्येक फिर्यादीची नावे व पत्ते द्यावेत.या प्रत्येक गुन्हेगारी घटनेत किती ग्रॅम सोनेचे ऐवज पळवला गेला? अशा गुन्हयातील किती प्रकरणातील किती आरोपी पकडण्यात पोलीसांना यश आले ?अशा प्रत्येक गुन्हेगारी घटनेतील कोणकोणत्या फिर्यादीचा किती ग्रॅम सोने ऐवज गुन्हेगार आरोपीकडून परत हस्तगत करण्यात आला ? यातील किती व कोणत्या फिर्यादींना त्यांचा प्रत्येकी किती ऐवज परत दिला गेला ?ऐवज परत मिळालेल्या फिर्यादींच नावे व पत्ते द्यावेत

२) या पोलीस स्टेशनच्या हद्दीत सन २०१२ ते २०१३ च्या आज अखेर तारखेपर्यंत ० ते १४ वयोगटातील किती बालके हरवली आहेत.हरवलेल्या बालकांमध्ये स्त्री जातीच्या बालकांची संख्या किती.यातील किती बालकांना शोधून काढण्यास पोलीसांना यश आले आहे. तपास न लागलेल्या बालकांची यादी द्यावी.पालकांचे पत्ते द्यावेत.

३) या पोलीस स्टेशनच्या हद्दीत सन २०१२ ते २०१३ च्या आज अखेर तारखेपर्यंत काळात घरफोडी/चोरी /दरोडेअशा किती घटना घडल्या ? प्रत्येक वर्षाचा तपशील द्यावा.अशा प्रत्येक गुन्हयातील प्रत्येकफिर्यादीची नावे व पत्ते द्यावेत. या प्रत्येक गुन्हेगारी घटनेत प्रत्येक फिर्यादीचा किती रूपये किंमतीचा काय काय माल/ऐवज चोरीला गेला? अशा गुन्हयातील किती प्रकरणातील किती आरोपी पकडण्यात पोलीसांना यश आले ?अशा प्रत्येक गुन्हेगारी घटनेतील किती व काय माल/ऐवज गुन्हगार आरोपीकडून परत हस्तगत करण्यात आल ? यातील किती फिर्यादींना न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांचा प्रत्येकी किती माल/परत देण्यात आला ? ऐवज परत मिळालेल्या फिर्यादींच नावे व पत्ते द्यावेत

४)या पोलीस स्टेशनच्या हद्दीत सन २०१२ ते २०१३ च्या आज अखेर तारखेपर्यंतकाळात सायकल/दुचाकी/ चारचाकी चोरी झाल्याच्या किती घटना घडल्या ?प्रत्येक वर्षाचा तपशील द्यावा.अशा प्रत्येक गुन्हयातील प्रत्येक फिर्यादीची नावे व पत्ते द्यावेत. या प्रत्येक गुन्हेगारी घटनेत किती रूपये किंमतीची कोणकोणती वाहने चोरीला गेली? अशा गुन्हयातील किती प्रकरणातील किती आरोपी पकडण्यात पोलीसांना यश आले ?अशा प्रत्येक गुन्होगारी घटनेतील कोणत्या फिर्यादीची किती वाहने गुन्हगार आरोपीकडून परत हस्तगत करण्यात आली? यातील किती व कोणकोणत्या फिर्यादींना त्यांची प्रत्येकी वाहने परत देण्यात आली ? वाहने परत मिळालेल्या फिर्यादींच नावे व पत्ते द्यावेत

५) ----- या कालावधीमधील पोलीस स्टेशन डायरी व वरीष्ठांशी झालेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती द्याव्यात.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण : ---------------------

दिनांक : / / २०१३

(नाव --------------------------)

मोबाईल :

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,महाराष्ट्र

## माहिती अधिकार कार्यकत्यांसाठी निवेदन

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार जागरूक नागरिक यांच्याकडून - शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्येसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा. ओळखपत्र खर्च / पोष्टेज व नागरिक अधिकार प्रकाशनांची तीन पुस्तके असे एकत्रीत मुल्य ५०० रूपये स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून खाते नंबर **32619447406** स्वराज बहुउद्देशिय संस्था,खारघर नवी मुंबई या नावाने भरावेत..बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर सभासद ओळखपत्र व पुस्तके पाठवली जातील.सभासदांना महासंघाच्या वेबसाईडवरून **web site : rtimahasangh.weebly.com** ऑनलाईन फार्म भरता येईल.या अंकात पान ७ वर दिलेला सभासद फॉर्म झेरॉक्स करून सविस्तर भरून फोटो चिकटवून तो सायबर कॅफेमधून स्कॅन करूनही **mediamansubhash@gmail.com** या ई मेलवरूनही पाठविल्यास अधिक सोईचे होईल.तरी जास्तीत जास्त माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी सभासद व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,महाराष्ट्र**

आता इंटरनेटवर ही उपलब्ध !

rtimahasangh.weebly.com

नागरिक अधिकार मासिकांचे जूने अंक

माहिती अधिकार महासंघाच्या सभासदांची यादी

नव्या घटना व घडामोडीची आवश्यक ती माहिती

ऑनलाईन सभासद नोंदविण्यांची सोय

**माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,महाराष्ट्र**

सभासदांना प्रत्येकी ५० किंमतीची सदर पुस्तके मिळतील

१ ) पेटून उठा ! व्यवस्था बदला !!

२) मागा म्हणजे नक्की मिळेल !

३) नागरिकांची सनद

४) माहितीचा अधिकार

५) माझे हक्क माझे कर्तव्य !

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ------------------------------------------------------------

पत्ता :------------------------------------------------------------

------------------------------ पीनकोड ☐☐☐☐☐☐

मोबाईल : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

ई मेल :---------------------

शिक्षण : ----------------------- जन्मदिनांक ------------------------------

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा: ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /------------------------------------

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी ओळखपत्र खर्च १७०पोष्टेज खर्च ८०रूपये आणि १५० रूपयांची तीन पुस्तके व स्थानिक शाखा शुल्क १०० रूपये असे एकत्रीत ५०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व नागरिक अधिकार विषयक पुस्तके मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावीत.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : ------------- सही

### कार्यालयीन उपयोगासाठी

सभासद कोड नंबर ☐

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१३ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१४
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- सभासद प्रक्रिया शुल्क मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली

आपण वेबसाईट rtimahasangh.weebly.com वरूनही ऑनलाईन फार्म भरू शकता

# ये है मेरा इंडिया !

आजही आपण अशा देशात राहत आहोत जेथे अम्ब्यूलन्स किंवा पोलीसांच्या गाडीपेक्षा पिझ्झा घरात लवकर पोहचतो.जेथे मोटारीसाठी ८ टक्के तर शिक्षणासाठी १२ टक्के दराने कर्ज मिळते.जेथे तांदुळ ४० रूपये किलो दराने घ्यावे लागतात.पण मोबाईलचे सीमकार्ड मोफत मिळू शकते.जेथे कोटयधीश क्रिकेटची अख्खी टीमच विकत घेतात परंतु देशबांधवांच्या कल्याणासाठी त्यांच्याकडे पैसा नाही.जेथे पादत्राणे एसी शो रूम मध्ये मिळतात.पण ज्याद्वारे पौष्टीक अन्न आपण खातो तो भाजीपाला फुटपाथवर विकला जातो.जेथे अन्न गोदामामध्ये सडते किंवा त्याला उंदिर खातात आणि त्याच वेळी देशात कुपोषणाने हजारो मृत्यूमुखी पडतात.अन्न पिकविणारा शेतकरी आत्महत्या करीत आहे. जेथे जगातील महागडया मोटारी खरेदी करणाऱ्यांची जणू स्पर्धा लागली आहे.पण त्या चालविण्यासाठी चांगले रस्ते शोधावे लागतात. जेथे केवळ आर्थिक चतूराईच्या जोरावर काही लोक कोटयवधी रूपये कमावतात मात्र देशाचे उदरभरण करणाऱ्या शेतकरी वर्गातील काही जणावर आत्महत्या करण्याची वेळ येते.जेथे स्वच्छतागृहापेक्षा मोबाईल फोन ची संख्या जास्त आहे.जेथे करोडो बेकार आहेत.पण सरकारी बाबू काम न करता पगार घेतात.

# ये यहाँ कब होगा ?

भारतीय गरीब आहेत.परंतु भारत हा गरीब देश नाही.हे वाक्य एक स्वीस बँकेच्या संचालकाचे आहे.त्याच्या म्हणण्यानुसार स्वीस बँकेत श्रीमंत भारतीयांनी दोन लाख ऐंशी हजार कोटी रूपये ठेवले आहेत.हा राजकारण्यांनी व भांडवलदारांनी लपविलेला काळा पैसा परत आणून भारतातच वापरला गेला तर पुढील ३० वर्षाचे अर्थसंकल्प करविरहीत करता येतील.रोजगार वाढीसाठी वापरला गेल्यास ६० कोटी भारतीयांना रोजगार मिळेल.सर्व भारतीय मुलांना मोफत शिक्षण देता येईल.दिल्ली पर्यंत जाणारे सर्व रस्ते चौपदरी करता येतील.भारतीयांना मोफत वीज पूरवठा करता येईल असे ५०० वीजप्रकल्प उभे करता येतील.प्रत्येक भारतीयांना पुढील ६० वर्षे महिन्याला २००० रूपये देता येतील.देशाला जागतीक बँकेकडून कर्ज घेण्याची गरज पडणार नाही.

पोस्ट परवाना.No.G/NMD/128/2012-14
RNI रजि.नं.MAHMAR/2011/40781

पाठविणार

पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-१६, सेक्टर-१२ खारघर
नवी मुंबई ४१०२१
महाराष्ट्र मो ९२२३५९६९२०

प्रति,

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले. रजि नं. MAHMAR/2011/40781